**<u>ठळक बातम्या</u>**

- वाहनांच्या ई- चलानच्या यंत्रणेत राज्य सरकार बदल करणार, लोक अदालतीतून थकीत दंड वसुलीचाही प्रयत्न

- लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना योग्य वेळी २१०० रुपये देण्याची सरकारची घोषणा, हजारो बोगस लाभार्थ्यांवर कारवाई सुरू

- पुण्यातल्या जमीन घोटाळ्यात पार्थ पवार यांना वाचवण्याचा प्रयत्न पोलिसांचा प्रयत्न आहे का असा मुंबई उच्च न्यायालयाचा सवाल

- जिल्हा परिषद आणि महानगरपालिका निवडणुका महायुती एकत्र लढणार

**आणि**

- चांदीच्या दराचा नवा विक्रम, किलोमागे साडे ६ हजार रुपयांची वाढ नोंदवत १ लाख ९१ हजारांच्या वर

**<><><><><>**

वाढती वाहनसंख्या तसंच ई - चलानच्या यंत्रणेत बदल करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अभ्यासगट स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानपरिषदेत ही घोषणा केली. ई चलानची वसुली करण्यासाठी लोक अदालत सारखा उपक्रम राबवण्याचा मानसही त्यांनी व्यक्त केला.

**होल्ड - मुख्यमंत्री चलन बाईट**

विधीमंडळाच्या इतर बातम्या जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून..

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१० डिसेंबर २०२५ - बुधवार

# होल्ड व्हाइस कास्ट

*(राज्यात सर्व इलेक्ट्रिक वाहनांना टोल माफ करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी  येत्या आठ दिवसात करावी आणि शासन निर्णय जारी केल्यापासून वसूल झालेली टोल रक्कम परत करावी, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज विधानसभेत दिले. अशा वाहनांसाठी राज्यभर चार्जिंग स्टेशन वाढवा आणि त्यांच्या क्षमतेत देखील वाढ करा, अशा सूचना अध्यक्षांनी यावेळी दिल्या.*

*मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना २१०० रुपयांचा हप्ता योग्य वेळी देण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिली. लाडकी बहीण योजनेसाठी  २ कोटी ४३ लाख ८२ हजार ९३६ अर्ज विभागाने पात्रतेनुसार ग्राह्य धरले आहेत, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी आज विधानसभेत दिली. आत्तापर्यंत १ कोटी ७४ लाखांहून अधिक महिलांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे, असंही त्यांनी सांगितलं. राज्यातल्या १२ ते १४ हजार महिलांच्या नावावर पुरुषांची बँक खाती जोडलेली असल्याचं पडताळणीत आढळलं असून अशा प्रकरणांचा सखोल तपास करून कुठलीही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही, याची खात्री केल्याचं तटकरे म्हणाल्या. तसंच ८ हजार शासकीय कर्मचाऱ्यांनी अपात्र असतानाही घेतलेल्या रकमेची वसुली गेल्या ५ ते ६ महिन्यांपासून सुरू असून पुढच्या दोन महिन्यांत ती पूर्ण होईल, असंही त्या म्हणाल्या.  दारूची दुकानं स्थलांतरित करण्यासाठी संबंधित इमारतीच्या नोंदणीकृत सोसायटीचा ना हरकत दाखला घेणं अनिवार्य राहील, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं.*

*निकृष्ट दर्जाची औषधं विक्री प्रकरणी राज्यातल्या १७६ किरकोळ आणि ३९ घाऊक औषध विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याचं अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी आज विधानसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.*

*दर्जेदार प्रवासी वाहतूक सेवा देण्यासाठी आठ हजार नवीन एस.टी. बसगाड्यांची खरेदी केली जाणार असून पहिल्या टप्प्यात तीन हजार तर दुसऱ्या टप्प्यात पाच हजार बसगाड्यांची  खरेदी केली  जाईल अशी    माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली. )*

**<><><><><>**

मतदार याद्या तयार करण्याची जबाबदारी देशाच्या राज्यघटनेनं निवडणूक आयोगावर टाकलेली असून विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम राबवणं ही आयोगाची जबाबदारी आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. निवडणूक सुधारणांविषयी लोकसभेत सुरू असलेल्या चर्चेत बोलताना त्यांनी या पुनरीक्षणावरून विरोधकांनी केलेल्या आरोपांचं खंडन केलं आणि सर्व विरोधी पक्ष, विशेषतः काँग्रेस या प्रक्रियेबाबत खोट्या गोष्टी पसरवून देशाची, सरकारची आणि निवडणूक आयोगाची बदनामी करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

निवडणूक आयोग सरकारच्या आखत्यारीत काम करत नाही, असं शहा यांनी स्पष्ट केलं.

मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा मूलभूत अधिकार असून निवडणूक आयोग पक्षपातीपणा करत असल्याची टीका काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल यांनी केली. निवडणूक आयोगानं निष्पक्ष पद्धतीनं काम करायला हवं, असं मत शिरोमणी अकाली दलाच्या हरसिमरत कौर बादल यांनी मांडलं. विशेष सखोल

पुनरीक्षण म्हणजे धर्माच्या आधारे मतदारांची नावं काढून टाकायचा प्रयत्न आहे, असा आरोप एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवेसी यांनी केला.

<><><><><>

पुण्यातल्या जमीन गैरव्यवहार प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ यांचं नाव एफआयआरमधे न नोंदवता इतर व्यक्तींची चौकशी करत पोलीस पार्थ पवार यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत का, असा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने विचारला आहे. या प्रकरणातील आरोपी शीतल तेजवानी यांनी दाखल केलेल्या जामीन अर्जावरील सुुनावणी न्यायाधीश न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकल पीठासमोर झाली, त्यावेळी न्यायालयानं हा प्रश्न विचारला. यावर पोलीस कायद्यानुसार आवश्यक कारवाई करतील, असं सरकारी वकील मानकुंवर देशमुख यांनी न्यायालयाला सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांना वार्ताहरांनी याबद्दल विचारलं असता तपास करून न्यायालयात योग्य उत्तर  दाखल केलं जाईल, असं सांगितलं.

**होल्ड बाईट मुख्यमंत्री**

<><><><><>

जिल्हा परिषद आणि महानगरपालिका निवडणुकीत महायुतीची एकजूट कायम राहणार असून ५१ टक्के मतं मिळवून महायुती विजयी होईल, असा विश्वास भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि चंद्रशेखर बावनकुळे यांची बैठक झाली, त्या पार्श्वभूमीवर वार्ताहरांनी विचारलेल्या प्रश्नाला बावनकुळे यांनी उत्तर दिलं. मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेनेनं ९० ते शंभर जागांची मागणी केली आहे, मात्र तांत्रिक बाबी तपासून जागावाटप केलं जाईल, मुंबईच्या महापौरपदाचा निर्णय फडनवीस, शिंदे आणि अजित पवार हे तिघे मिळून घेतील, असं बावनकुळे म्हणाले.

<><><><><>

देशात चांदीच्या दरांनी आज नवी उच्चांकी पातळी गाठली. कालच्या तुलनेत साडे ६ हजार रुपयांनी चांदी महाग झाली आणि मुंबईच्या बाजारपेठेत एक किलो चांदीसाठी १ लाख ९१ हजार रुपये मोजावे लागत होते. काल १ किलो चांदी १ लाख ८४ हजार रुपये दराने मिळत होती.

सोन्याच्या दरात मात्र फारशी वाढ झाली नाही. एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ३१ हजार रुपये मोजावे लागत होते.

<><><><><>

विविध गटांच्या ११ जहाल नक्षली अतिरेक्यांनी आज गडचिरोली इथं पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. या सर्वांवर मिळून ८२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. भामरागड दलमच्या विभागीय समितीच्या दोन सदस्यांचाही यात समावेश आहे.

<><><><><>

एका दूध उत्पादक आणि कृषी कंपनीविरुद्ध मनी लॉंड्रिंग प्रकरणाच्या तपासाचा भाग म्हणून ईडी, अर्थात सक्तवसुली संचालनालयानं राज्यात आज विविध ठिकाणी छापे टाकले. गुंतवणूकदारांच्या १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा घोटाळा केल्याचा आरोप या कंपनीवर आहे. विद्यानंद डेअरी आणि विद्यानंद ॲग्रो फीड या कंपन्याचा प्रवर्तक आनंद लोखंडे आणि काही व्यावसायिकांच्या आस्थापनांवर छापे टाकले, त्यात पुणे शहर आमि बारामतीतल्या प्रत्येकी दोन, तर इंदापुरातल्या एका ठिकाणाचा समावेश आहे.

<><><><><>

शेतजमिनीच्या खरेदी खतासंदर्भात मनाजोगा निकाल देण्याकरता लाच मागणाऱ्या सिन्नर इथल्या  नायब तहसीलदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं ताब्यात घेतलं आहे. संजय भिकाजी धनगर असं त्याच नाव आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात काल मंदिर परिसर स्वच्छता अभियान झालं. जिल्ह्यातल्या ४४३ मंदिरांमधे  ८ हजार ९७० ग्रामस्थांनी श्रमदान केलं. या मोहिमेत सव्वा ६०० किलो प्लास्टिक  तर सुमारे दीड हजार किलो अन्य असा एकूण २ हजार किलोहून अधिक कचरा गोळा झाला.

<><><><><>

नवी मुंबई महापालिकेनं यावर्षी आतापर्यंत २ टनांहून अधिक एकदाच वापरता येणाऱ्या प्लॅस्टिकच्या पिशव्या जप्त केल्या आहेत. यासाठी १० विशेष पथकं तैनात असून २० लाख ६५ हजार रुपयांचा दंडही पालिकेनं वसूल केला आहे.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात मराठवाड्यात अनेक ठिकाणी मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात काही ठिकाणी, तर कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//